अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ४ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## तहसीलदारांच्या नावे मागितली २५ हजाराची लाच

**मोहोळ :** अन्न धान्याची खाजगी वाहने मोहोळ हद्दीतून जात होती त्यावर कोणतेही कारवाई न करण्यासाठी तहसीलदारांच्या नावाने २५ हजाराची लाच मागणाऱ्या एका खाजगी इसमास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून ताब्यात घेण्यात आले.

खाजगी इसम दाजीसाहेब श्रीमंत काकडे (वय-४३, रा.काकडे वस्ती,पंढरपूर रोड,मोहोळ जि. सोलापूर) असे ताब्यात घेण्यात आलेल्या खाजगी इसमाचे नाव आहे. यातील तक्रारदार यांचे व त्यांच्या मित्राचे अडत धान्य व्यवसायाच्या खरेदी-विक्रीचे अनुषंगाने दुकानातील धान्याची (गहु,ज्वारी व तांदुळ) टॅम्पो, छोटा हत्ती अशा वाहनातून मोहोळ हद्दीतुन वाहतुक होत असल्याने धान्यांच्या गाड्यांवर कोणताही गुन्हा दाखल न करण्याकरीता यातील खाजगी इसम दाजीसाहेब काकडे यांनी तत्कालीन मोहोळ तहसिलदार प्रशांत बेडसे पाटील यांचेकरिता म्हणून तक्रारदार यांचेकडे मासिक हप्ता स्वरुपात २५ हजार रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्यास संमती दिले.यावरुन वरील संशियित आरोपीस ताब्यात घेवुन गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया मोहोळ पोलीस ठाणे,सोलापूर ग्रामीण येथे उशीरापर्यंत सुरु होती. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, चंद्रकांत कोळी, उमांकांत महाडिक पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पोलीस अंमलदार शिरीषकुमार सोनवणे, पोना श्रीराम घुगे, पोना.नरोटे पोह.गायकवाड, पोशि.शाम सुरवसे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# डोक्यात शस्त्राने घाव घालून ‘पीएसआय’ची निर्घृण हत्या

## रात्रीची शतपावली जिवावर बेतली, मारेकऱ्यांनी दबा धरून वेळ साधली

सुराज्य/सांगोला

**सांगोला तालुक्यात अज्ञात मारेकऱ्यांनी धारदार शस्त्राने डोक्यात घाव घालून एका पोलीस उपनिरीक्षकाची हत्या केली. सूरज विष्णू चंदनशिवे (वय-४२) असे त्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. वासूद येथील केदारवाडीच्या रस्त्यावर हा थरारा बुधवारी रात्री घडला. नेहमीच्या सवयीप्रमाणे सूरज हे रात्रीचे जेवण करून केदारवाडीच्या रस्त्यावर शतपावलीसाठी गेले होते. त्यावेळी दबा धरून बसलेल्या अज्ञात मारेकऱ्यांनी पाठीमागून धारदार शस्त्राने त्यांच्या डोक्यात वार केले. रक्ताच्या थारोळ्यात ते रस्त्यावरच पडले. घरी परत न आल्याने कुटुंबियांनी शोधाशोध सुरू केली मात्र गुरूवारी पहाटे त्यांचा मृतदेह दिसून आल्यानंतर चंदनशिवे कुटुंबियांना जबर धक्का बसला. सांगोला शहर व परिसरात दोन दिवसांमध्ये सलग दोन खून झाल्यामुळे ग्रामीण पोलीस दलात खळबळ उडाली आहे.**




वासूद येथील केदारवाडी येथे सूरज राहावयास होते. बुधवारी रात्री जेवणानंतर रात्री घरापासून काही अंतरावरील केदारवाडी रोडवर ते शतपावली करण्यासाठी गेले. रात्री ११ वाजणेच्या सुमारास आधीपासूनच दबा धरून बसलेल्या अज्ञात मारेकऱ्यांनी पाठीमागून डोक्यात वार करून त्यांचा खून केल्याचा पोलिसांचा संशय आहे. घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली. सूरज चंदनशिवेची योचर पोलीस खात्यातील सेवा वादग्रस्त ठरली होती. त्यांचे कुणा गुन्हेगाराशी वैर होते का? आर्थिक व्यवहार होता की अन्य काही कारणे त्यामागे आहेत,याचा पोलीस तपास करत आहेत. सोलापूर जिल्हा पोलीस प्रमुख शिरीष सरदेशपांडे, उपविभागीय पोलीस अधिकारी गायकवाड, जिल्ह्यातील पोलीस अधिकारी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

### गूढ वाढले

तपासासाठी सात ते आठ पथके रवाना झाली आहेत. काही जणांची चौकशी सुरू आहे. घटनास्थळी श्वान पथक मागविण्यात आले होते.श्वास पथक घुटमळत सूरज यांच्या घरापर्यंत गेल्याचे पोलिसांनी सांगितले.त्यामुळे या प्रकरणाचे गूढ वाढले आहे.मारेकऱ्यांनी निर्घृणपणे हत्या केल्यानंतर सूरज यांना ऊसाच्या चिखलात फेकून दिले होते.

### कारकीर्द वादग्रस्त

सूरज यांची पोलीस दलातील कारकीर्द वादग्रस्त होती. २०१८ मध्ये वारणानगर येथील ९ कोटी रुपये चोरीच्या प्रकरणात त्यांचे नाव समोर आले होते. त्यानंतर पोलीस सेवेतून त्यांना बडतर्फ करण्यात आले होते. एका वर्षापूर्वी हे निलंबन रद्द करून सांगली मुख्यालयात ते रुजू झाले होते. सांगली मुख्यालयात कार्यरत असताना पुन्हा एकदा दोन महिन्यांपूर्वी सूरज यांना बडतर्फ करण्यात आले होते. पोलीस दलातील सेवेबरोबरच सूरज यांचा व्यवसाय होते.त्यांची फॅमिली राजकारणाशी संबंधित होती. त्यांचे थोरले बंधू मंत्रालयात सेवेत असून आई वासूद गावच्या सरपंच होत्या. चंदनशिवे कुटुंबीयांचा पंढरपूरजवळ दूध प्रकल्प आहे.

## बार्शीत महाविद्यालयीन युवकाने झाडाला घेतला गळफास

सुराज्य/बार्शी

विज्ञान शाखेत पदवीच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या युवकाने शहरातील पॉलिटेक्नीक कॉलेजच्या मागे एका झाडाला अज्ञात कारणाने गळफास घेतल्याची घटना दि. ३ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास उघडकीस आली.



ऋत्विक हनुमंत शिंदे (वय २० मूळ रा. बाभुळगांव ता बार्शी सध्या रा. वायकुळे प्लॉट, बार्शी) असे मयत विद्यार्थ्याचे नाव आहे. याबाबत मयताचे चुलते सागर मिटू शिंदे (रा. बार्शी) यांनी याबाबत पोलिसात खबर दिली आहे. शिवाजी कॉलेजचे सेवक महाविद्यालयीन कामानिमित्त पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये गेले असता एकाने झाडाला गळफास घेतल्याचे त्यांना खिडकीतून दिसले. त्यांनी पोलीस ठाण्यास कळवले. त्यानंतर ऋत्विकच्या कुटुंबीयांना माहीत झाले.

## पोटाच्या आजाराला कंटाळून भोयरे येथे युवकाची आत्महत्या

सुराज्य/बार्शी



पोटाच्या आजाराने त्रस्त असलेल्या युवकाने घरात गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील भोयरे येथे मंगळवार दि. १ रोजी घडली. तुषार तानाजी पाटील (वय २८ रा. भोयरे) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. त्याच्या पश्चात वडील, आजी, बहीण, चुलत भाऊ, चुलते असा परिवार आहे. शिवाजी पाटील यांचा तो पुतण्या होता. अधिक तपास पोहेकॉ अरूण डिकुळे करत आहेत.

# Suicide विद्यार्थ्यांपासून व्यावसायिकापर्यंत आत्महत्येचे ग्रहण

## ध्रुव हॉटेलच्या मालकाची गोळी झाडून आत्महत्या



सुराज्य/सोलापूर

शहरातील जुना एम्प्लॉयमेंट चौकातील हॉटेल ध्रुवचे मालक अजिंक्य जयवंत राऊत (वय-५६) यांनी राहत्या घरात स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली.ही घटना गुरूवारी दुपारी विजयपूर रस्त्यावरील इंदिरा नगर येथील त्यांच्या निवासस्थानी घडली.

शहरातील डफरीन चौक ते जुना एम्प्लॉमेंट मार्गावर अजिंक्य राऊत यांचे प्रसिध्द असे ध्रुव हॉटेल आहे.अजिंक्य राऊत हे या हॉटेलचे मालक होते. गेल्या अनेक वर्षापासून शहरात या हॉटेलचा एक नावलौकिक आहे.हॉटेल शेजारी असलेल्या आलिशान अशा जुन्या पद्धतींच्या इमारतीत अजिंक्य राऊत आपले पत्नी व मुलासह राहत होते.सहा महिन्यापासून या निवासस्थानाची डागडुजी होत असल्याने विजापूर रोडवरील इंदिरा नगर येथे पत्नी व दोन मुलींसह राहण्यास गेले होते.गेल्या अनेक दिवसापासून ते आजारी होते.गेल्या आठवड्यात त्यांना उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. उपचारातून बरे होऊन ते घरी आले होते. मात्र गुरूवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास ते घरी एकटेच असताना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळून आले.



नरड्याच्या खाली एक मोठी जखम होती. रक्तस्त्राव होत होता.पत्नी व नातेवाईकांनी त्यांना त्या अवस्थेत उपचाराकरिता अश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. परंतु उपचारादरम्यान ते मयत झाले. शिव विच्छेदनाकरिता मृतदेह शासकीय रुग्णालयात आणण्यात आला तेव्हा त्या ठिकाणी त्यांच्या नातेवाईक मित्रमंडळींनी व हॉटेलिंग मधील कर्मचाऱ्यांनी एकच गर्दी केली होती. सुरुवातीला हॉटेल ध्रुव हे फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने या पोलीस ठाण्याचे अधिकारी व पथक आले. नंतर हा प्रकार त्यांनी इंदिरानगर येथील घरात झाला असल्यामुळे विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पथक या ठिकाणी अधिक चौकशीसाठी दाखल झाले. हा मृत्यू नेमका कसा झाला याचा तपास पोलीस करत आहेत. प्रतिष्ठित आणि श्रीमंत घराण्यातील अजिंक्य राऊत यांचाही मोठा मित्र परिवार होता. यात अनेक राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, सिनेनाट्य कलावंत, उद्योजकांचा समावेश होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, बहिणी परिवार आहे.

**हॉटेल ध्रुवचे मालक अजिंक्य राऊत यांचा मृत्यू कोणत्या कारणासाठी झाला हे मात्र सध्या अस्पष्ट असून, यासंदर्भात विजापूर नाका पोलिसांशी संपर्क साधला.त्यावेळी पुढील तपास सुरू असून लवकरच कारण समोर येईल असे पोलीस सूत्रांनी बोलताना सांगितले.**

## पॉलिटेक्निक कॉलेजच्या तरुणाने राहत्या घरी घेतला गळफास

सुराज्य/सोलापूर

गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक मध्ये शिकणाऱ्या एका १७ वर्षीय किशोरवयीन तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शिवगंगा नगर भाग ५, कुमठा नाका) येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. यशराज निरंजन निंबाळकर (वय १७ रा. शिवगंगा नगर भाग ५) असे मयत तरुणाचे नाव आहे.




आज सकाळी दहा वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील बेडरूम मध्ये छताच्या पंख्याला नायलॉन दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून (काका) यांनी शासकीय रुग्णाला दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत यशवंत निंबाळकर हा पॉलिटेक्निकमध्ये कॉम्प्युटरचे शिक्षण घेत होता. सकाळी १० वाजेच्या सुमारास तो नाष्टा केला. आणि चुलत्यांना कॉलेजला सोडायला सांगितले होते. ड्रेस बदलण्यासाठी तो बेडरूम मध्ये गेला तो परतला नाही. त्यावेळी खिडकीतून पाहिले असता तो गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला.

त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत यशराज निंबाळकर यांच्या पश्चात आई-वडील आणि दोन भाऊ असा परिवार आहे. त्याचे वडील निरंजन हे बांधकाम मिस्त्री म्हणून काम करतात .या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आता या खुर्च्या वेळेवर भरतील !!!

कल्याण
599-30-136

मेन बाजार
233-88-224

# लेटकमरमध्ये दोन उपजिल्हाधिकारी एक तहसीलदार
# आता हजेरीसाठी बायोमॅट्रिक प्रणाली आणणार

## जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय, खुलासा करण्यासाठी ‘लेटकमर’ यांची गर्दी


सुराज्य/सोलापूर



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अचानक जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील झाडाझडती घेतली होती. लेटकमर कर्मचाऱ्यांना नोटिसा देत २४ तासात खुलासा करण्याचे आदेश दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणीचा फटका दोन उपजिल्हाधिकारी एक तहसीलदार आणि विभाग प्रमुखाला बसला आहे.

ज्यांना नोटीस मिळाल्या, त्यांची खुलासा करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षाबाहेर गुरूवारी गर्दी केली होती. त्यांच्यावर वचक बसवण्यासाठी सर्वच अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी आता लवकरच बायोमेट्रीक मशीन बसविण्यात येणार आहे. जुन्या व नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बायोमेट्रीक हजेरी बंधनकारक करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

बुधवारी सकाळी साडेदहा वाजता आशीर्वाद यांनी अचानक जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयांची अचानक तपासणी सुरू केली. परिसरातील यावेळी कर्मचाऱ्यांची पळापळी झाली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या तपासणीचा चांगलाच धसका कर्मचारी, अधिकाऱ्यांनी घेतला होता. दरम्यान, कर्मचारी नियोजित वेळेत कार्यालयात यावेत व वेळेनंतरच कार्यालयातून बाहेर पडावे, यासाठी आता बायोमेट्रीक मशीन बसवण्याचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आहे. जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातही महसूल विभागाची अनेक कार्यालये आहेत. त्याठिकाणी व नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात अशा दोन्ही ठिकाणी बायोमेट्रीक मशीन बसविण्यात येणार आहेत. मुख्यालयानंतर हळूहळू सर्वच तहसील कार्यालयात बायोमेट्रीक मशीन बसविण्यात येणार आहे. या निर्णयामुळे लेटकमर कर्मचाऱ्यांची मोठी पंचाईत झाली असून त्यांना वेळेत कार्यालयात येण्याशिवाय आता गत्यंतर राहिले नाही.




### अन्यथा कारवाई...

सकाळी दहा ते सायंकाळी ६ कार्यालयीन वेळेत चहा व जेवणाच्या नावाखाली कुणी बाहेर फिरताना आढळून आल्यास अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे.

### नागरिकांना रोज भेटणार

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे कार्यालयीन कामाचे आठवड्यातील पाचही दिवस दुपारी १ ते २ व सायंकाळी ५ ते ६ अशा दोन सत्रात नागरिकांना भेटणार आहेत. या दोन्ही वेळेत नागरिकांची गाऱ्हाणी व तक्रारी ऐकून घेणार आहेत. यापूर्वी सोमवार व शुक्रवार असे दोनच दिवस नागरिकांच्या भेटीसाठी होते. परंतु नागरिकांप्रती नवे जिल्हाधिकारी संवेदनशील असल्याने त्यांनी आठवड्यातील पाचही दिवस नागरिकांना भेटण्याचा निर्णय घेतला आहे.